दिनांक २२ मार्च, २०२०

- मा. कुलगुरू यांचे 'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर आदेश

कोरोना संदर्भात उपाययोजना करण्यासाठी देशभर प्रयत्न होत आहेत . या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर येत्या २५ मार्च 2020 पर्यंत संपुर्णतः बंद ठेवण्याचे आदेश मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी दिले आहेत. या काळात सर्व अधिकारी, शिक्षक व कर्मचारी यांनी मुख्यालय न सोडता घरी बसूनच आवश्यक असेल ते प्रशासकीय व शैक्षणिक काम करावे, असे निर्देशही मा. कुलगुरू यांनी दिले आहेत. यानूसार येत्या २५ मार्च 2020 पर्यंत विद्यापीठ परिसर पुर्णतः बंद ठेवण्यात येणार आहे, तसेच विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा हेही या काळात पुर्णतः बंद राहील.

कोरोना विषाणुचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव/प्रसार विद्यापीठ परिसरात होऊ नये तसेच अधिकारी,कर्मचारी, विद्यार्थी यांना त्याचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून सदर निर्देश दिले गेले आहेत .

सदरील आदेश दिनांक २५ मार्च, २०२० पर्यत आपत्कालीन परिस्थिती म्हणुन लागू केला आहे. 25 मार्च 2020 नंतर पुढील परिस्थिती पाहून निर्णय घेऊन त्या प्रमाणे कळविण्यात येईल.
सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख यांनी आपल्या अधिनस्थ शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सदर आदेश निदर्शनास आणून द्यावे तसेच सर्व संबंधीतांनी याची नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी . तसेच २५ मार्चपर्यंत विद्यापीठ परिसर बंद राहील याची नोंद सर्व संलग्नित महाविद्यालये, पालक, विद्यार्थी व सर्व संबधितांनी घ्यावी.

डॉ. तुषार देशमुख,
कुलसचिव,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ